## शहराच्या मध्यवर्ती भागात नवीन फ्लॅट्स विकणे आहे

विष्णुप्रिया हाईट्समध्ये पहिला मजला कमर्शिअल आहे. उर्वरित ४ रेसिडेंसिअल 2BHK फ्लॅट्स प्राईम लोकेशन सह विकणे आहे. (दोन महिन्यात ताबा)
पत्ता : दक्षिण कसबा, आनंद मंगल कार्यालयाजवळ, दाते गणपती मंदिराजवळ
मो. : ९८८१२४५०२७

एकाच १RK फक्त मुली/महिलाकरिता भाड्याने देणे आहे



दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com



## मंगल कार्यालय

लग्न, रिसेप्शन, साखरपुडा, मुंज, बारसे, वाढदिवस नव्या स्वरूपात सर्व सोयी सुविधांसह उपलब्ध.

**सौभाग्य मंगल कार्यालय**

आरटीओ जवळ, विजापूर रोड, सोलापूर, **मो.:** ९०९६९६६२२२



सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष १९ वे, अंक २२५ वा | रविवार, दि. १३ एप्रिल २०२५ | पाने ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR



**Sona's**
**Beauty Care**

एका ब्रायडल मेकअप बुकिंगवर एक साईडर मेकअप फ्री

१० % डिस्कॉऊंट ऑन ऑल सर्विसेस

शॉप नं. १५, नाथ प्लाजा, सात रस्ता, सोलापूर

सौ. शैलजा करजगीकर - बिराजदार
८४८४०५८५५०

वेळ : १२ ते दु. ३ पर्यंत.
बुधवारी सुट्टी राहील.
नियम व अटी लागू


# ईव्हीएम हॅक करता येतं, निकालही फिरवता येतो!

## अमेरिकेच्या गुप्तचर विभागाच्या हाती पुरावे

**नवी दिल्ली (वृत्त सेवा):-** हिंदुस्थानात गल्लीपासून दिल्लीपर्यंत ईव्हीएम घोटाळयाचा आरोप विरोधी पक्षांकडून होत असतानाच ईव्हीएम हॅक करता येतं आणि निवडणुकीचा निकालही फिरवता येतो, याचे पुरावे हाती लागले आहेत, असा खळबळजनक दावा अमेरिकेच्या गुप्तचर विभागाच्या प्रमुख तुलसी गब्बार्ड यांनी केला आहे.

ईव्हीएमवर टेस्लाचे प्रमुख एलन मस्क यांनी आक्षेप घेतला होता. त्यानंतर आता अमेरिकेच्या राष्ट्रीय गुप्तचर यंत्रणेनेच ईव्हीएमचे पितळ उघडे पाडले आहे. गुप्तचर विभागाच्या संचालक तुलसी गब्बार्ड यांनी मंत्रिमंडळाच्या बैठकीतच गौप्यस्फोट केला. ईव्हीएम मशीन सहज हॅक केले जाऊ शकते, याचे पुरावे हाती लागल्याची माहिती त्यांनी या बैठकीत दिली.

**तरीही आयोगाचा तोच दावा**

अमेरिकेच्या गुप्तचर विभागाने ईव्हीएमची पोलखोल केली असतानाही हिंदुस्थानच्या निवडणूक आयोगाने मात्र पुन्हा तोच राग आळवला. आपल्या देशात वापरल्या जाणाऱ्या



ईव्हीएमची तुलना इतर देशांतील ईव्हीएमशी करणे चुकीचे आहे. आपले ईव्हीएम हॅक करणे शक्य नाही. हे मशीन एका कॅलक्युलेटरप्रमाणे काम करते, असा दावा निवडणूक आयोगाने केला.

**मोदी, केंद्र सरकार, निवडणूक आयोग गप्प का ? : सुरजेवाला**

तुलसी गब्बार्ड यांच्या दाव्यानंतरही पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्र सरकार आणि निवडणूक आयोग गप्प का? निवडणूक आयोग सूत्रांच्या हवाल्याने ईव्हीएमचे समर्थन करणाऱ्या बातम्या का पेरत आहे, असा सवाल काँग्रेसचे सरचिटणीस रणदीप सुरजेवाला यांनी केला. सर्वेच्च न्यायालयाने गब्बार्ड यांच्या दाव्याची स्वतःहून दखल घ्यावी आणि तपास सुरू करण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणीही सुरजेवाला यांनी केली.

राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी कालच 2020च्या निवडणुकीतील सीआयएसएचे तत्कालीन संचालक ख्रिस व्रेब्स यांच्या भूमिकेबद्दल चौकशीचे आदेश दिले आहेत आणि आता ईव्हीएमबाबत हे पुरावे आमच्या हाती लागले आहेत. आमच्यासाठी हे मोठे यश आहे, असेही गब्बार्ड यांनी नमूद केले.

**बॅलेट पेपरवर निवडणुका घ्याव्यात**

इलेक्ट्रॉनिक मतदान पद्धती पूर्णपणे असुरक्षित आहे. या पद्धतीने होणाऱ्या मतदानात सहज फेरफार करता येतो, असे तपासात उघड झाले आहे. हॅकर्ससाठी हा डाव्या हाताचा खेळ आहे. त्यामुळेच मतदारांचा निवडणूक व्यवस्थेवरचा विश्वास कायम राखायचा असेल आणि निवडणुका पारदर्शक होण्यासाठी देशभरात बॅलेट पेपरवर मतदान सक्तीचे करण्याची आवश्यकता आहे, असे तुलसी गब्बार्ड यांनी नमूद केले.

## स्वातंत्र्यसेनानी संदिपानदादांच्या स्मृतिदिनानिमित्त घेतलेल्या महाआरोग्य शिबिरात ७३९ जणांनी घेतला लाभ

**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** स्वातंत्र्यसेनानी संदिपान गायकवाड स्मृतिदिननिमित्त स्वातंत्र्यसेनानी संदीपान दादा गायकवाड बहुउद्देशीय व संशोधन संस्था मोहोळ आणि रेड स्वस्तिक सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने मोहोळ येथे आयोजित करण्यात आलेल्या भव्य मोफत महाआरोग्य तपासणी व रोग निदान शिबिरामध्ये सुमारे ७३९ जनानी त्याचा लाभ घेतला असून येणाऱ्या काळात दर



महिन्याला सदरील मोफत शिबिर सुरू ठेवण्यात येणार असून या माध्यमातून शस्त्रक्रिया ही मोफत करण्यात येणार असल्याची माहिती संयोजक डॉ. कौशिक गायकवाड यांनी दिली.

मोहोळ येथील स्वातंत्र्यसेनानी संदिपान गायकवाड सभागृहात भव्य मोफत महाआरोग्य तपासणी व रोग निदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. प्रारंभी याचे उदघाटन जिल्हा न्यायाधीश जयराज वडणे यांच्या हस्ते तर अमेरिकेतील टेक्सास विद्यापीठाचे सहयोगी प्राध्यापक डॉ. सुहास व्यवहारे यांच्या उपस्थितीमध्ये पार पडले.

या वेळी डॉक्टर कौशिक गायकवाड, अशोक गायकवाड, सुरेश गायकवाड, डॉ.दिलीप कादे, डॉ.नासीर खान, डॉ. सुनील गायकवाड, डॉ.सचिन भोसले उपनगराध्यक्ष प्रमोद डोके नगरसेवक, नगरसेवक तथा मोहोळ नागरी सहकारी पत्तसंस्थेचे व्यवस्थापक मुस्ताक शेख, आरोग्य ओपीडीचे सचिन शास्त्री आदि उपस्थित होते .

(पान 4 वर..)

## माढा मतदारसंघात नवीन प्राथमिक आरोग्य उपकेंद्राना निधी मंजूर

### खा. धैर्यशील मोहिते पाटील यांच्या प्रयत्नांना यश

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** माढा लोकसभा मतदारसंघाचे खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांना यश आले असून, राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत माढा, करमाळा,



माळशिरस, सांगोला आणि पंढरपूर या तालुक्यांमधील नवीन प्राथमिक आरोग्य उपकेंद्रे आणि बीपीएचयू (BPHU) बांधकामाच्या प्रकल्पांना मंजूरी मिळाली आहे. या कामांमुळे माढा लोकसभा मतदारसंघातील ग्रामीण भागातील आरोग्य सुविधांमध्ये मोठी सुधारणा होणार आहे.

या तालुक्यांमध्ये साधारण ९ कोटी खर्चाच्या विविध प्रकल्पांना मंजुरी देण्यात आली आहे. यामध्ये माढ्यात ग्रामीण रुग्णालयात (BPHU) बांधकामाच्या करिता 50.00 लाख, (पान 4 वर..)




# भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताहानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन





**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सामाजिक न्याय व विशेष सहाय विभागामार्फत भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताहानिमित्त विविध कार्यक्रमाचे दि. 8 एप्रिल ते 14 एप्रिल 2025 पर्यंतच्या कालावधीत आयोजन करण्यात आले आहे. तरी विविध कार्यक्रमांचा लाभ घ्यावा, असे आवाहन समाज कल्याण सहायक आयुक्त, सुलोचना सोनवणे यांनी केले आहे.

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व वंचित दुर्बल घटकातील व्यक्तींच्या सर्वांगीण विकासाचे ध्येय साध्य करण्यासाठी राज्य शासनाकडून विविध कल्याणकारी योजनांची माहिती सर्वसामान्य जनतेला व्हावी तसेच जनतेत जनजागृती निर्माण व्हावी या उद्देशाने भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताह कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे.

दि.08 एप्रिल ते 14 एप्रिल या कालावधीत राज्यात भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताह हा कार्यक्रम साजरा करण्यासाठी राज्यातील सर्व प्रशासकीय विभागाच्या अधीनस्त सर्व कार्यालयांनी व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी यांनी त्यांच्या अधीनस्त असणा–या सर्व कार्यालयांना विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्याचे निर्देशानुसार सहायक समाज कल्याण कार्यालय सोलापूर यांच्या वतीने शुक्रवार दि.11 एप्रिल 2025 रोजी क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती निमित्त महात्मा फुले यांच्या सामाजिक कार्याविषयी व्याख्यानाचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, सात रस्ता सोलापूर आयोजन करण्यात आलेले होते. यावेळी मान्यवरांच्या हस्ते महापुरुषांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाचे पाहुणे व व्याख्याते व्याख्याते संघप्रकाश मारुती दुड्डे यांनी महात्मा फुले यांच्या जिवनावर मौल्यवान विचार व्यक्त केले. कार्यक्रमाचे आभार समाज कल्याण निरीक्षक संजय साळुंखे यांनी मानले. तर कार्यक्रमाचे सुत्रसंचालन समतादूत श्रीमती अश्विनी सातपुते यांनी केले. सदर कार्यक्रमास सहायक आयुक्त कार्यालयातील सर्व कर्मचारी उपस्थीत होते.

सामाजिक समता सप्ताह अंतर्गत सहायक आयुक्त समाज कल्याण कार्यालयामार्फत दि. 12 एप्रिल 2025 रोजी मु.पो. हगलूर ता. उ. सोलापूर येथे महिला मेळाव्याचे आयोजन करण्यात आलेले आहे. सदर कार्यक्रमांस जास्तीत जास्त महिलांनी सहभागी व्हावे, असे आवाहनही समाज कल्याण सहायक आयुक्त श्रीम. सुलोचना सोनवणे, यांनी केले आहे.

# महामंडळाच्या सक्षमीकरणासाठी मिशन मोडवर काम करावे - विखे-पाटील





**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** जलसंपदा विभाग हा महत्त्वाचा विभाग आहे. या विभागाशी सर्व यंत्रणा, नागरिक, शेतकरी व अन्य घटक जोडले गेले आहेत. त्यामुळे जलव्यवस्थापन कृती पंधरवड्यात राबविण्यात येणाऱ्या उपक्रमाच्या माध्यमातून जलसंपदा विभाग अधिक लोकाभिमुख करून महामंडळाच्या सक्षमीकरणासाठी मिशन मोडवर काम करावे, अशा सूचना जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे–पाटील यांनी आज दिल्या.

जलसंपदा विभागामार्फत 15 ते 30 एप्रिल 2025 कालावधीत 'जल व्यवस्थापन कृती पंधरवडा' साजरा केला जाणार आहे. या पंधरवड्याच्या आयोजनासंदर्भात जलसंपदा मंत्री विखे–पाटील यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात बैठक संपन्न झाली. यावेळी जलसंपदा (विदर्भ, तापी, कोकण पाटबंधारे विकास महामंडळ) व आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन (दूरदृश्य प्रणालीद्वारे), जलसंपदा विभागाचे अपर मुख्य सचिव दीपक कपूर, सचिव संजय बेलसरे, मुख्य अभियंता संजीव टाटू उपस्थित होते. बैठकीस दूरदृश्य प्रणालीद्वारे जिल्हाधिकारी व जलसंपदा विभागाचे अधिकारी सहभागी झाले होते.

मंत्री विखे–पाटील म्हणाले, या पंधरवड्याच्या माध्यमातून जलसाक्षरतेसाठी विविध उपक्रम राबवून जल व्यवस्थापनावर अधिक भर दिला जावा. लोकाभिमुख कार्यक्रमाच्या माध्यमातून विभागाची वेगळी ओळख निर्माण झाली पाहिजे या पद्धतीने जनजागृतीचे उपक्रम राबविण्यात यावेत. सिंचन व्यवस्था अधिक प्रभावीपणे होण्यासाठी कालवे प्रवाही राहणे अत्यंत महत्त्वाचे आहेत. कालवे दुरुस्ती, कालव्यातून होणारी गळती रोखण्यासाठी जलव्यवस्थापन कृती पंधरवडा मध्ये कालव्यांची स्वच्छता करण्यास प्राधान्य देण्यात यावे. या कामात स्वयंसेवी संस्थांची मदत घ्यावी. कालवे स्वच्छ आणि प्रवाही राहिल्यास पाण्याचा कार्यक्षम वापर होऊन शेवटच्या घटकाला पाणी उपलब्ध होईल आणि त्यामुळे जनसामान्यात शासनाची प्रतिमा उंचावेल. या कामात स्थानिक प्रशासन आणि नागरिक यांचाही सहभाग घेऊन जलव्यवस्थापनाच्या प्रक्रियेला गती देण्यात यावी. तसेच कालव्यांवरील अतिक्रमणे काढण्यासही प्राधान्य देण्यात यावे.

जलसंपदा विभागाच्या ताब्यात असणाऱ्या मालमत्तांची मोजणी करण्यासाठी नवीन तंत्रज्ञानाचा वापर करावा. या जागांची 7/12 वर नोंदणी करून घ्यावी. यासाठी ॲक्शन प्लॅन करण्यात यावा. जलसंपदा विभागाच्या अखत्यारित असणाऱ्या जागेवरील अतिक्रम काढण्यासाठी मोहीम स्वरूपात काम करावे. लोकसंख्येच्या प्रमाणानुसार पाणी वापर ठरला असून त्यानुसार पाणी वापराचे ऑडिट करून घ्यावे. पाण्याची गळती रोखण्यासाठी नगरपालिका, महानगरपालिका आणि आणि क्षेत्रीस्तरावर उपाययोजना राबविण्यात याव्यात. 'जलव्यवस्थापन कृती पंधरवडा' मध्ये जलसंपदा विभागातील अधिकारी कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण, शेतकरी, पाणी वापर संस्था संवाद, थकीत पाणीपट्टी वसुली, जल व्यवस्थापनासाठी विद्यार्थ्यांचा सहभाग, अनधिकृतपणे पाणी वापर रोखणे, सांडपाण्याचा पुनर्वापर या विषयांनाही प्राधान्य देण्यात यावे, अशा सूचनाही जलसंपदा मंत्री विखे–पाटील यांनी दिल्या.

सोलापूर जिल्हाधिकारी कार्यालय येथे दूरदृश्य प्रणालीद्वारे आयोजित बैठकीत अपर जिल्हाधिकारी मोनिका सिंह ठाकूर, जलसंपदा विभागाचे अधीक्षक अभियंता व प्रशासक लाभक्षेत्र विकास प्राधिकरणचे सु. स. खांडेकर, अधीक्षक अभयिंता भीमा कालवा मंडळाचे धि. साळे, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणचे कार्यकारी अभयिंता पी. व्ही. पाटील तसेच संबंधित विभागाचे अधिकारी यावेळी सहभागी झाले होते.

पान १ वरून

## स्वातंत्र्यसेनानी संदिपानदादांच्या...



स्वातंत्र्य सेनानी संदीपान दादा गायकवाड बहुउद्देशीय व संशोधन संस्थेच्या वतीने आयोजित केलेल्या मोफत महा आरोग्य शिबिराचे उद्घाटन करताना जिल्हा न्यायाधीश जयराज वडणे, टेक्सास विद्यापीठ अमेरिकेचे सहयोगी प्राध्यापक डॉ. सुहास व्यवहारे, कौशिक गायकवाड

यावेळी या शिबिरामध्ये रेड स्वास्तिक सोसायटीचे सुरेश कोते, डॉ. अशोक घोणे, अशोक शिंदे, डॉ. क्रांती महाजन, डॉ. जे एस दुगल, डॉ. राम पाटील, डॉ. मंदार पाटील, डॉ. मंजिरी पाटील, डॉ. सुनील साळवे, डॉ. प्रवीण मासाळ, डॉ. अमेय ठाकूर, डॉ. अच्युत नरोटे यांनीसहभाग नोंदवित आरोग्य तपासणी करून औषध उपचार केले.

या महाआरोग्य शिबिरात संयोजकामार्फत वेगवेगळ्या विभागात केलेल्या तपासणी शिबिरामध्ये हृदयरोग, कर्करोग, नेत्ररोग, अर्धांग वायू उपचार, न्युरो, मेंदू, मणके, यकृत, किडनी, ब्रेनस्ट्रोक, स्त्रीरोग, कृत्रिम अंग प्रत्यारोपण, तपासणी व उपचार शस्त्रक्रियासह बीपी, शुगर, थायरॉइड, ईसीजी, रक्ताच्या सर्व चाचण्याही विनामूल्य करण्यात आल्या. यासह विविध आजारासाठी वेगवेगळ्या विभागात दिवसभर गरजू रुग्णांनी भेटी देऊन तपासणी केले असून आवश्यकतेनुसार पुढील शस्त्रक्रिया मोफत करण्यात येणार आहेत. या महाआरोग्य शिबिराचे नेटके नियोजन चंद्रमोळी पतसंस्थेचे चेअरमन राजेश खपाले, चंद्रमोळी पतसंस्थेचे व्हाईस चेअरमन राकेश देशमाने, चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष नाना डोके, उपसरपंच विजय कोकाटे, वैभव गुंड, चंद्रकांत वाघमोडे, श्रीकांत गायकवाड, मोहन होनमाने, गाटे साहेब, सुनिल साठे, नितीन टिळे, तेजस बोबडे, भाऊसाहेब गायकवाड, अनिल नाईक, शैलेश गावडे आदीजनानी योग्य केले.

## माढा मतदारसंघात नवीन...

करमाळामध्ये ₹2.95 कोटी, माळशिरसमध्ये ₹2.35 कोटी, ग्रामीण रुग्णालय सांगोला बीपीएचयूः ₹50.00 लाख आणि पंढरपूरमध्ये ₹2.35 कोटींचा समावेश आहे. ज्यामध्ये करमाळातील कारंजे, नियोरे, फिसरे, मांगी; माळशिरसातील कोथळे, मैडद, शिंगोर्णी; आणि पंढरपूरमधील होळे, जळोली, पेहे येथील प्राथमिक आरोग्य उपकेंद्रांचे बांधकाम आणि ग्रामीण रुग्णालयांमध्ये बीपीएचयू उभारणीचा समावेश आहे, ज्यामुळे स्थानिकांना दर्जेदार आरोग्य सेवा मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांनी माढा लोकसभा मतदारसंघातील आरोग्य सुविधांच्या वाढीवर विशेष भर दिला असून, त्यांनी केंद्र सरकारकडे वारंवार मागणी करत आहेत. त्यांच्या प्रयत्नांमुळे या तालुक्यांतील नागरिकांना लवकरच चांगल्या आरोग्य सुविधा मिळणार आहे.

या कामांना तातडीने सुरुवात होण्याची अपेक्षा असून, संबंधित प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण करून लवकरात लवकर बांधकामाला गती देण्याचे नियोजन सुरू आहे. माढा लोकसभा मतदारसंघातील या विकास प्रकल्पांमुळे ग्रामीण भागातील आरोग्य सेवांना नवा आयाम मिळेल, असा विश्वास व्यक्त होत आहे.

# जीवनात येणारे बदल सकारात्मकपणे स्विकारा : नारायण शिरगावकर




**नातेपुते (कटूसत्य वृत्त):-** ऑनलाईन पद्धतीने होणारे हनी ट्रॅप, बँक बॅलन्स रिकामे करणारे कॉल याकडे दुर्लक्ष करून कष्ट आणि मेहनतीवर विश्वास ठेवावा. कुठल्याही केलेल्या कायार्चा सन्मान इतरांना प्रेरणा देतो तसेच जीवनात येणारे बदल सकारात्मकपणे स्वीकारावे. सर्व चांगल्या कामासाठी पोलीस प्रशासनाकडून महावितरणला नेहमीच सहकार्य राहील असे प्रतिपादन अकलूज विभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी नारायण शिरगावकर यांनी केले. आर्थिक वर्ष मार्च 2025 अखेर अकलूज विभागांमध्ये चालू व थकीत विजविले वीज बिले वसूल करून महावितरण चा महसूल वाढवल्याबद्दल सर्व अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी गौरव सांघिक कामगिरीचा या कार्यक्रमाचे आयोजन करून सर्व अधिकारी व कर्मचारी यांना उपविभागीय पोलीस अधिकारी नारायण शिरगावकर महावितरण चे कार्यकारी अभियंता अण्णासाहेब काळे अतिरिक्त कार्यकारी अभियंता संदीप कोकरे यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. यावेळी उपविभागीय पोलीस अधिकारी नारायण शिरगावकर बोलत होते.

यावेळी बोलताना कार्यकारी अभियंता अण्णासाहेब काळे म्हणाले की वर्षभरात सर्व अधिकारी व कर्मचारी हे वादळ वारे पाऊस यामध्ये वीजपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी अतोनात प्रयत्न करतात तर वीज बिल वसुली ही तितक्याच जोमाने केली आहे सांघिक कामगिरी, विजचोरी रोखणे, नवीन वीज जोडणी देणे, रोहित्र नादुरुस्तीचे प्रमाण कमी असणे अशा वेगवेगळ्या विभागांमध्ये उत्कृष्ट कामगिरी केलेल्या शाखा कार्यालयांचा प्रोत्साहन पर सन्मान करण्यात आला आहे. त्यामुळे सर्व कर्मचाऱ्यांनी यापुढेही सांघिक काम केल्यास त्यांना निश्चित यश मिळेल असे प्रतिपादन कार्यकारी अभियंता अण्णासाहेब काळे यांनी केले.या कार्यक्रमासाठी अकलूज विभागातील उपकार्यकारी अभियंता, सहाय्यक अभियंता व सर्व कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उपकार्यकारी अभियंता स्वानंद शिंदे यांनी केले.

# लोकमंगल कृषी महाविद्यालयात क्रांतीसुर्य महात्मा फुले यांची जयंती साजरी



**वडाळा (कटूसत्य वृत्त):-** श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान संचलित आणि महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी संलग्नित लोकमंगल कृषी महाविद्यालय वडाळा येथे राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत दिनांक ११ एप्रिल रोजी थोर समाज सुधारक क्रांतीसुर्य महात्मा फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून रत्नाई कृषी महाविद्यालय अकलूजचे सहाय्यक प्राध्यापक डॉ. एस. आर. माने यांनी उपस्थिती दर्शवली. यावेळी प्रमुख अतिथी, लोकमंगल कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अमोल शिंदे आणि विद्यार्थी प्रतिनिधी यांच्या हस्ते सत्यशोधक महात्मा फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. महाराष्ट्रासह देशभर सुरु असलेल्या कित्येक चळवळींची प्रेरणा म्हणून महात्मा फुले यांचे नाव अग्रणी घेतले जाते. महात्मा फुले यांनी त्यांच्या शैक्षणिक योगदाना द्वारे स्त्रीशूद्रातिशूद्र म्हणजेच उपेक्षित समाजाला आणि स्त्री वर्गाला ज्ञानाचा मार्ग खुला करुन दिला. त्यांनी लिहिलेल्या शेतकऱ्यांचा आसूड या ग्रंथांच्या माध्यमातून शेतीच्या आधुनिकीकरणाचा मार्ग जगासमोर मांडला. क्रांतीसुर्य महात्मा फुले यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचा पोवाडा लिहून महाराजांचा जातीपाती विरहित विचार गावोगावी नेवुन सामाजिक ऐक्याची भावना समाजामध्ये रुजवली. महात्मा फुले यांनी सत्यावर विश्वास ठेवणारा समतामूलक समाज निर्माण करावा या उद्देशानं सत्यशोधक समाजाची स्थापना देखील केली. समाज व्यवस्थेतील दोषांवर केवळ बोट न ठेवता कृतीशील पर्याय देखील देण्याचं काम त्यांनी सत्यशोधक समाजाच्या माध्यमातून केले. अशा थोर समाजसुधारकांच्या जीवन चरित्राचे स्मरण आणि आचरण विद्यार्थ्यांनी आपल्या दैनंदिन जीवनात करावे असा मौलिक विचार याप्रसंगी व्यक्त करण्यात आला. सदरील कार्यक्रमास प्रा. सुजाता चौगुले, प्रा नवनाथ गोसावी, प्रा.मीनाक्षी नाईकनवरे, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रा. अजित कुरे आणि विद्यार्थी–विद्यार्थिनी प्रतिनिधींची उपस्थिती होती.

# खा. धैर्यशील मोहिते-पाटील यांच्या पाठपुराव्याला यश

## ३८ कोटींची एनएमएमएस शिष्यवृत्ती विद्यार्थ्यांच्या खात्यात जमा



**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्रातील हजारो गुणवंत विद्यार्थ्यांसाठी दिलासादायक ठरलेली एनएमएमएस शिष्यवृत्ती अखेर पात्र विद्यार्थ्यांच्या खात्यात जमा झाली आहे. खासदार धैर्यशील मोहिते–पाटील यांनी या विषयावर संसदेत शुन्य प्रहर कालावधी मध्ये आवाज उठवला होता. त्यांच्या पाठपुराव्यानंतर केंद्र सरकारने लक्ष घालून तब्बल ३८ कोटी रुपयांची शिष्यवृत्ती थेट विद्यार्थ्यांच्या बँक खात्यांमध्ये वितरित केली आहे.

राज्यातील ३१ हजार विद्यार्थ्यांना या वितरणाचा लाभ झाला आहे. एनएमएमएस (राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती योजना) अंतर्गत निवड झालेल्या विद्यार्थ्यांची नावे केंद्र शासनाच्या एनएसपी पोर्टलवर पाठवण्यात आली होती. मात्र तांत्रिक अडथळे व प्रशासनिक विलंबामुळे अनेक विद्यार्थ्यांना वेळेवर शिष्यवृत्ती मिळत नव्हती.

या बाबत खा. धैर्यशील मोहिते–पाटील यांनी हे प्रकरण संसदेत मांडून शासनाचे लक्ष वेधले होते. त्यांनी संबंधित मंत्रालयाशी सातत्याने पाठपुरावा केला. त्यांच्या प्रयत्नांमुळेच ही प्रक्रिया मार्गी लागली असल्याची भावना विद्यार्थ्यांचे पालक व शिक्षक व्यक्त करत आहेत.

राज्याचे शिक्षण आयुक्त राजेश क्षीरसागर यांनी देखील विद्यार्थ्यांना आधार व बँक खात्याचे सीडिंग वेळेत पूर्ण करण्याचे आवाहन केले आहे, जेणेकरून कोणत्याही अडचणीशिवाय शिष्यवृत्ती प्राप्त होईल.

# नेताजी प्रशालेच्या २०१ विद्यार्थ्यांनी केले हनुमान चालीसा पठण




**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** नीलम नगर येथील नेताजी सुभाषचंद्र बोस शिक्षण संकुलातील हनुमान मंदिरात हनुमान जन्मोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला.यावेळी नेताजी सुभाषचंद्र बोस प्रशालेच्या २०१ विद्यार्थ्यांनी आठ वेळा वाद्यवृंदासह सामूहिक हनुमान चालीसा पठण केले.

शनिवारी सकाळी सहा पासून भक्तगण हनुमानाची दर्शन घेण्यासाठी मंदिरात येत होते.नेताजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अण्णाराव कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली सकाळी 'श्री'चे रुद्राभिषेक व महाआरती करण्यात आले.वेदमुर्ती शिवानंद स्वामी यांनी विधीवत पूजन केले. भक्तिमय वातावरणात पार पडलेल्या या सामूहिक हनुमान चालीसा पठणात भक्तगण सहभाग घेतले. आपली मनोकामना पूर्ण होण्यासाठी भक्तगण रुईच्या पानांची हार, नारळ, टरबूज, मीठ, खडीसाखर, डाळीचे फुटाणे, वेगवेगळे फळे हे नैवेद्य म्हणून दाखवित होते.

वेदमूर्ती धानय्या मठपती व सेवानिवृत्त प्राचार्य सुभाष धुमशेट्टी यांच्या हस्ते भक्तगणांना महाप्रसादाची वाटप करण्यात आले.याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष अण्णाराव कुंभार, खजिनदार ललिता कुंभार, सेवानिवृत्त प्राचार्य विजयकुमार हुल्ले, प्राचार्य रविशंकर कुंभार, मुख्याध्यापक ज्ञानेश्वर म्हेत्रे, मुख्याध्यापिका विजयालक्ष्मी कुंभार, मुख्याध्यापिका वैशाली कुंभार, बंडा प्रशालेचे मुख्याध्यापक मल्लिकार्जुन बिराजदार , लक्ष्मण चलगेरी, पर्यवेक्षक गौरीशंकर आळंगे आदी उपस्थित होते.

याप्रसंगी अध्यक्ष अण्णाराव कुंभार म्हणाले, हनुमान हा संकटमोचक असल्याने प्रत्येक भक्तांनी मनापासून हनुमान चालीसाचे पठण करावे. पठण केलेल्या भक्तांना याची नक्की जाणीव होते.म्हणून प्रत्येकांनी हनुमान चालीसाचे महत्त्व व फायदे समजावून घ्यावे असे ते आवाहन केले.हनुमान चालीसा, बजरंग बाण व मारुती स्तोत हे दररोज म्हणण्यासंबंधी मार्गदर्शन केले. हनुमान भक्त मल्लिनाथ जमखंडी यांनी काढलेल्या हनुमान रांगोळी रेखाटणेचे भक्तांकडून कौतुक होत होते.

दिवसभर, नीलम नगर परिसरातील भक्तगण हनुमानचे दर्शन घेतले. नेताजी शिक्षण संकुलातर्फे महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आली होती.मंदिरावर विद्युत रोषणाई करण्यात आली होती.

कार्यक्रम होण्यासाठी प्रशालेतील शिक्षक विश्वाराध्य मठपती, विठ्ठल कुंभार, सिद्धाराम कुंभार, चंद्रशेखर पाटील, अशोक पाटील, शितल पाटील, राजकुमार मुलगे, संतोष प्रचंडे, विनायक कोरे, प्रकाश कोरे, गणपती पाटील, बसवराज तेगेळ्ळी, चंद्रकुमार कुंभार, सचिन होटगे, आप्पासाहेब उंबरगीकर , नागेश कळंत्रे यांच्यासह संस्थेतील सर्व शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी वृंदानी परिश्रम घेतले.

श्रीहरी बहुउद्देशीय व संशोधन संस्था,संचलित,



शार्वी अभ्यासिका

जुळे सोलापूरातील पहिली अत्याधुनिक

* वैशिष्ट्ये *
* वातानुकूलित सुसज्ज इमारत, प्रसन्न वातावरण व माफक फी
* मुलां–मुलींसाठी स्वतंत्र बसण्याची व्यवस्था * स्वतंत्र प्रसाधनगृह
* आरामदायी बैठक, डेस्क लॅम्प * प्रदुषणमुक्त वातावरण
* वेळोवेळी तज्ञांचे योग्य मार्गदर्शन * वाहन तळाची सोय
* शुध्द पिण्याच्या पाण्याची व्यवस्था * प्रत्येक जागा आरक्षित
* दर्जेदार दैनिक वर्तमान पत्रे, मासिके इ. मोफत उपलब्ध
* लॅपटॉप,मोबाईल चार्जिंगसाठी स्वतंत्र पॉईंट *मर्यादित प्रवेश क्षमता * वर्षभरासाठी नोंदणी करणाऱ्या विद्यार्थ्यांना फीमध्ये सवलत

संपर्कासाठी पत्ता

एफ–३, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर.

संपर्कः–९६५७०६९०६९/८८५६९२७९४७